**प्रकल्पप्रवर्तक मे. हनिफा हरुण फजलानी,** (HARE KRISHNA METALLICS PVT. LTD) **मांदिवली बॉक्साईट भूखंड, गाव-मांदिवली, तालुका-दापोली, जिल्हा-रत्नागिरी, महाराष्ट्र येथे (खनिजपट्ट्याचे क्षेत्रफळ - १३९.०५ हेक्टर) क्षेत्रावरील उत्पादन नियोजित प्रकल्पाची क्षमता - वार्षिक ०.२२ दशलक्ष टन, एकूण कमाल उत्खनन - ०.२६ (बॉक्साईट - ०.२२ दशलक्ष टन वार्षिक आणि टाकाऊ माल ०.०४ दशलक्ष टन वार्षिक) त्याचबरोबर २००.० टन प्रती ताशी खनिजमाल फोडण्याची यंत्रणा असलेल्या प्रस्तावित प्रकल्प संदर्भात पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणीबाबत इतिवृत्त -**

---

प्रकल्पप्रवर्तक मे. हनिफा हरुण फजलानी, (HARE KRISHNA METALLICS PVT. LTD) मांदिवली बॉक्साईट भूखंड, गाव-मांदिवली, तालुका-दापोली, जिल्हा-रत्नागिरी, महाराष्ट्र येथे (खनिजपट्ट्याचे क्षेत्रफळ - १३९.०५ हेक्टर) क्षेत्रावरील उत्पादन नियोजित प्रकल्पाची क्षमता - वार्षिक ०.२२ दशलक्ष टन, एकूण कमाल उत्खनन - ०.२६ (बॉक्साईट - ०.२२ दशलक्ष टन वार्षिक आणि टाकाऊ माल ०.०४ दशलक्ष टन वार्षिक) त्याचबरोबर २००.० टन प्रती ताशी खनिजमाल फोडण्याची यंत्रणा असलेल्या प्रस्तावित प्रकल्प संदर्भात पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी बुधवार, दिनांक १८ ऑक्टोबर, २०२३ रोजीदुपारी १२.०० वाजतामौजे मांदीवली, गट नं. १, ब्राम्हणवाडी स्टॉपजवळ, मंडणगड-केळशी रोड, तालुका-दापोली, जिल्हा - रत्नागिरी (४१५ २०३), महाराष्ट्र येथे आयोजित करण्यात आलेली होती.

श्री. संजय जिरापूरे, उप प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, चिपळूण तथा आयोजक, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी श्री. चंद्रकांत सूर्यवंशी, अपर जिल्हादंडाधिकारी, रत्नागिरी तथा अध्यक्ष, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती, श्री जगन्नाथ शं सांळुखे, प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, कोल्हापूर तथा सदस्य,पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती, प्रकल्प प्रवर्तकांचे अधिकारी, पत्रकार, पर्यावरणविषयक कार्यरत सेवाभावी संस्था, चॅनलचे प्रतिनिधी व मोठ्या संख्येने उपस्थित असलेल्या स्थानिक जनतेचे स्वागत करुन माननीय अध्यक्षांच्या परवानगीने पर्यावरणविषयक जनसुनावणी प्रक्रिया सुरु केली.

आयोजक, पर्यावरण विषयक जाहीर जनसुनावणी समिती यांनी असे सांगितले की, भारत सरकारच्या पर्यावरण, वने व हवामान बदलमंत्रालय, नवी दिल्ली यांच्या दिनांक १४ सप्टेंबर, २००६ व सुधारित दिनांक १ डिसेंबर, २००९ आणि १४ ऑगस्ट, २०१८ च्या अधिसूचनेनुसार विशिष्ट प्रकल्पांना पर्यावरणविषयक अनुमती घेणे बंधनकारक असून त्यासाठी आगाऊ पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी आयोजीत करणे बंधनकारक करण्यात आलेले आहे.

आयोजक, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की, प्रकल्प प्रवर्तक मे. हनिफा हरुण फजलानी (Applied for Change of Name HARE KRISHNA METALLICS PVT. LTD.)

, मांदिवली बॉक्साईट भूखंड, गाव-मांदिवली, तालुका - दापोली, जिल्हा-रत्नागिरी, **महाराष्ट्र** यांचा त्यांच्या मांदिवली बॉक्साईट भूखंड, गाव-मांदिवली, तालुका-दापोली, जिल्हा-रत्नागिरी, महाराष्ट्र येथे (खनिजपट्ट्याचे क्षेत्रफळ - १३९.०५ हेक्टर) क्षेत्रावरील उत्पादन नियोजित प्रकल्पाची क्षमता - वार्षिक ०.२२ दशलक्ष टन, एकूण कमाल उत्खनन - ०.२६ (बॉक्साईट - ०.२२ दशलक्ष टन वार्षिक आणि टाकाऊ माल ०.०४ दशलक्ष टन वार्षिक) त्याचबरोबर २००.० टन प्रती ताशी खनिजमाल फोडण्याची यंत्रणा असलेल्या प्रस्तावित प्रकल्प संदर्भात पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी आयोजित करण्यासाठी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळास अर्ज प्राप्त झाला.

सदरहू प्रकल्प पर्यावरण अधिसूचना २००६ आणि सुधारित नुसार संवर्ग बी-१ (ए) (४) मध्येमोडत असल्याने सदरहू प्रकल्पास राज्य पर्यावरण आघात मुल्यांकन प्राधिकरण (SEIAA), पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्रालय, महाराष्ट्र शासन, मुंबई यांची "पर्यावरण अनुमती" प्राप्त करणे व त्यासाठी आगाऊ पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी घेणे बंधनकारक आहे.

आयोजक यांनी असे स्पष्टीकरण दिले की, पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणीचा मूळ उद्देश प्रकल्प परिसरातील सामान्य जनतेस प्रकल्पा विषयी व प्रकल्पामुळे होणारे परिणाम व त्याबाबत सामान्य जनतेच्या भावनाजाणून घेणे, प्रकल्पात बंधनकारक असणा-या प्रदूषण नियंत्रण संयत्रणेची माहिती सामान्य जनतेस देणे व त्यांनी दिलेल्या सूचनेचा विचार करणे आहे.

प्रकल्प प्रवर्तकांनी राज्य पर्यावरण आघात मुल्यांकन प्राधिकरण, पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्रालय, महाराष्ट्र शासन, मुंबई यांची प्राथमिक मान्यता

(ToR) प्रदान करण्यासाठी व पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल तयार करण्यासाठी ऑनलाईन अर्ज दिनांक २५-०५-२०२३रोजी सादर केला व त्यास अर्जास ऑनलाईन मंजूरी दिनांक २६-०५-२०२३रोजी प्रदान केली.

जिल्हाधिकारी, रत्नागिरी यांनी प्रत्यक्ष (Physical) पर्यावरणविषयक जनसुनावणी घेण्यास बुधवार , दिनांक१८ ऑक्टोबर, २०२३रोजीदुपारी १२.०० वाजता मान्यता दिल्यानंतर सदस्य सचिव, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई यांनी भारत सरकारच्या पर्यावरण व वने हवामान बदल मंत्रालयाच्या अधिसुचना दिनांक १४-०९-२००६ व सुधारित अधिसुचना दिनांक ०१-१२-२००९ अनुसार त्यांच्या कार्यालयीन आदेश क्रं. ई-६९/२०२३ ,व्दारा पत्रक्रं.बीओ/जेडी/डब्लुपीसी/पीएच/बी-२३१०००१एफटीएस-०२२५ दिनांक-११-१०-२०२३ अन्वये खालीलप्रमाणे पर्यावरण विषयक जाहीर जनसुनावणी समिती गठित केलीः-

१) जिल्हादंडाधिकारी,रत्नागिरी, किंवा त्यांचे प्रतिनिधी (अतिरिक्त जिल्हादंडाधिकारी यांच्यापेक्षा कमी दर्जाचा नसावा) - **अध्यक्ष**

२) महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,मुंबई यांचे प्रतिनिधी - प्रादेशिक अधिकारी -कोल्हापूर, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, कोल्हापूर - **सदस्य**

३) उप प्रादेशिकअधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, चिपळूण - **आयोजक**

सदरहू अधिसूचनेनुसार उप प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, चिपळूण यांनी जनसुनावणी दिवसाच्या ३० दिवस अगोदर स्थानिकवृत्तपत्र दैनिक तरुण भारत यात मराठीत व राष्ट्रीय वृत्तपत्र इंडियन एक्सप्रेस यात

इंग्रजीत दि. १२-०९-२०२३ रोजी जनसुनावणीबाबत प्रकाशित केली होती.त्याचप्रमाणे सदरहू प्रकल्पाबाबतचा सर्व दस्तावेज लोकांच्या माहितीकरीता खालील अधिसूचित कार्यालयात उपलब्ध करण्यात आलेले होते -

१) क्षेत्रीय कार्यालय, पश्चिम मध्य झोन, पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, न्यु सेक्रेटरिअल बिल्डिंग तळमजला, ईस्ट विंग, सिव्हिल लाईन,. नागपूर,

२) मा. जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, रत्नागिरी,

३) महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग कैंद्र,रत्नागिरी,

४) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद कार्यालय, रत्नागिरी,

५) उप विभागीय अधिकारी, दापोली, तालुका-दापोली,जिल्हा -रत्नागिरी,

६) तहसीलदार, तहसील कार्यालय- दापोली, तालुका- दापोली, जिल्हा- रत्नागिरी,

७) सरपंच/ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय -मांदिवली, तालुका- दापोली,जिल्हा- रत्नागिरी,

८) संचालक, पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग, महाराष्ट्र शासन, नवीन प्रशासकीय इमारत, १५ वा मजला, मादाम कामा मार्ग, मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.

९) सहसंचालक (जल प्रदूषण नियंत्रण) - मुख्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, कल्पतरू पॉईंट, ३रा मजला, सायन माटुंगा स्कीम रोड नं. ८, सायन (पूर्व), मुंबई - ४०० ०२२

१०) प्रादेशिक अधिकारी, प्रादेशिक कार्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, उद्योग भवन, जिल्हाधिकारी कार्यालय, कोल्हापूर - ४१६ ००२

१०) उप प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,पारकर कॉम्प्लेक्स, दुसरा मजला, गाळा नं.२२४, नगर परिषदेमागे, चिपळूण, तालुका-चिपळूण, रत्नागिरी - ४१५ ६०५

११) संकेतस्थळ, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई

उपरोक्त प्रकल्पा विषयी उप प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, चिपळूण यांना दहा सूचना / आक्षेप प्राप्त झालेल्या आहेत.

आयोजक यांनी उपस्थित असलेल्या सर्वांना त्यांचे काही आक्षेप, हरकती, सूचना असल्यास ती संधी देण्यात आलेली असून ते लेखी वा तोंडी स्वरुपात ती देऊ शकतात असे सांगितले.

आयोजक यांनी प्रतिपादन केले की, ही समिती फक्त लोकांचे पर्यावरण विषयक मत, सूचना, आक्षेप नोंदविण्यासाठी असून प्रकल्प संमत करणे, नाकारणे किंवा शिफारस करण्याचा अधिकार या समितीस नाही. आपण जनसुनावणीत उपस्थित केलेल्या सूचना/आक्षेपांची इतिवृतात नोंद घेण्यात येईल. त्याचप्रमाणे संदरहू बैठकीची व्हिडिओ रेकॉर्डीग जशीच्या तशी चित्रफित, बैठकीत उपस्थित करण्यात आलेल्या सूचना, आक्षेप यांची नोंद घेऊन प्रकल्प प्रवर्तकांचा सुधारित पर्यावरण मुल्यांकन अहवाल पर्यावरण, पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्रालय, महाराष्ट्र शासन, मुंबई यांना अध्यक्ष, पर्यावरण विषयक जाहीर जनसुनावणी समिती यांच्या संमतीने मुख्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळयांच्या तर्फे सादर करावयाचा असतो. त्यावर तेथील तज्ञ समिती त्याबाबत पुढील निर्णय घेते. आयोजक यांनी अध्यक्षांच्या परवानगीने प्रकल्पाच्या पर्यावरण सल्लागार यांना सादरीकरण सुरु करण्याचे आदेश दिले,

माननीय अध्यक्षांच्या परवानगीने प्रकल्प पर्यावरण सल्लागार यांनी प्रकल्पाविषयी व पर्यावरण व्यवस्थापन योजनेविषयी सादरीकरण केले.

प्रकल्पाचे पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की हनिफा फजलानी यांच्याकडून हरे कृष्णा मेटालिक्स, गोवा येथे लीज हस्तांतरणाची प्रक्रिया शासकीय पातळीवर सुरू आहे. त्यांनी सांगितले की सदरहू प्रकल्पाचा एकूण खर्च रुपये २०.६कोटी आहे. तर पर्यावरण व्यवस्थापनासाठी भांडवली खर्च अंदाजे - रुपये ०.५० कोटी, तर आवर्ती खर्च - रुपये ०.१५ कोटी रुपये आहे. खनिजपट्ट्याच्या सीमेभोवती , रस्त्याच्या दोन्ही बाजूस हरितपट्टा विकसित करण्यात येईल. त्याचप्रमाणे सीमेपासून ७.५ मीटर सोडाव्या लागणा-या सुरक्षा पट्ट्यात व पुनर्भरण केलेल्या खड्ड्यावर वनीकरण केले जाईल. प्रकल्पात ३८ व्यक्तींची गरज असून सर्व मनुष्यबळ हे स्थानिक गावातूनच घेतले जाईल.

सादरीकरण पूर्ण झाले असताना खाण विरोधी संघर्ष समितीचा मोर्चा बैठकीच्या स्थानावर आला. त्यांनी खाण हटाव - मांदिवली बचाव घोषणा दिल्या.

सदस्य, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी उपस्थित घोषणा देणा-या आंदोलकांना सांगितले की आम्ही आंदोलनाची नोंद घेतलेली आहे.

सदस्य, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सर्व उपस्थितांना शांततेचे आवाहन करुन त्यांचे प्रस्तावित प्रकल्पाविषयी असलेले पर्यावरणीय विचार, सूचना वा आक्षेप नोंदविण्याचे आवाहन केले. आपण उपस्थित केलेले मुद्दे शासनास सादर करण्यात येतील. ही समिती कुठलाही प्रकल्पास मंजूरी देत नाही, नामंजूरही करत नाही, त्याचप्रमाणे प्रकल्पाचे समर्थनसुध्दा करत नाही. आपण उपस्थित केलेल्या सूचना, आक्षेप यांची नोंद घेण्यात येऊन महाराष्ट्र शासनाच्या पर्यावरण विभागातील तज्ज्ञ समिती याबाबत निर्णय घेते. तरी आपण शांततेने बसावे आणि आपल्या सूचना किंवा आक्षेप नोंदवावेत.

त्यावेळेस प्रकल्पविरोधी आंदोलक यांनी बैठकीत बॅनर्स, मांदिवली बचाव घोषणा टोप्यांवर लिहिलेले वाक्य, घोषणा देत बैठकीत प्रवेश केला. त्यावेळी सदस्य, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी उपस्थित घोषणा देणा-यांना बैठकीस स्थानापन्न होण्याची विनंती करत होते.

सदस्य, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी उपस्थितांना सांगितले की जिल्हाधिकारी यांचे प्रतिनिधी अपर जिल्हाधिकारी हे रत्नागिरीहून आपल्या प्रस्तावित प्रकल्पाविषयी सूचना, आक्षेप नोंदविण्यासाठी आलेले आहेत. ही समिती आपल्यासाठीच गठित करण्यात आलेली आहे. येथे कुठलाही निर्णय होत नाही. या समितीस प्रस्तावित प्रकल्पास मान्यता देणे, नाकारणे वा प्रकल्पाची शिफारस करण्याचा अधिकार नाही. बैठकीतील सर्वांना बोलण्याची संधी देण्यात येईल. सर्वांचे म्हणणे ऐकून घेण्यात येईल. उपस्थितांना लेखी सूचना करावयाच्या असल्यस त्याही स्विकारण्यात येतील. उपस्थितांनी केलेल्या तोंडी सूचनांची नोंद घेण्यात येईल. तरी सर्वांनी स्थानापन्न होऊन शांततेने आपले विचार, सूचना, टीकाटिप्पणी किंवा आक्षेप उपस्थित करण्यात यावेत.

सदस्य, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी वारंवार आंदोलनकर्ते, घोषणा करणा-यांना शांतता राखून बैठकीत स्थानापन्न होण्याची विनंती केली.

त्यावेळी एक आंदोलकाने पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समितीस विनंती केली की हा खाणीचा विषय स्थानिक आहे. मांदिवली गावाचा आहे. येथे बैठकीत बरेच लोक हे बाहेरुन आलेले आहेत. त्यांनी उगीचच खुर्च्या अडविलेल्या आहेत. तरी त्यांनी बैठकीबाहेर जाण्याची सूचना करण्यात यावी, आणि स्थानिकांना स्थापन्न होण्याची सूचना करण्यात यावी. त्यांनी उपस्थितांनाही तशीच विनंती सूचना केली. तरी ज्यांचा हा विषय आहे, त्यांना बसण्याची संधि देण्यात यावी. सर्व आंदोलकांनी त्यास पाठिंबा देऊन समुहाने घोषणा देत होते.

सदस्य, पर्यावरणविषयंक जाहिर जनसुनावणी समिती हे उपस्थितांना वारंवार शांत राहण्याचे आवाहन करत होते. त्यांनी सांगितले आपल्या सर्वांचे मत ऐकण्यासाठीच ही बैठक आयोजित करण्यात आलेली आहे. त्यावेळी काही आंदोलकसुध्दा शांततेने मत मांडण्याची सूचना सर्व आंदोलकांना करत होते. त्यावेळी सदस्य, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी शेतकरी, कष्टकरी यांना वैयक्तिक मत, सूचना किंवा आक्षेप नोंदवायचे असल्यास ते उपस्थित करण्यात यावेत असे सांगितले. सर्वांच्या सूचना, आक्षेप यांची नोंद करण्यात येणार आहे. त्याचप्रमाणे ज्यांना लेखी निवेदन सादर करावयाचे आहेत, ते त्यांनी सादर करावेत. त्यास प्रकल्प प्रवर्तकांकडून लेखी स्वरुपात उत्तर देण्याची सूचना करण्यात येत असून ते बैठकीच्या इतिवृता सोबत शासनास सादर करण्यात येईल. तरी एकाएकाने येऊन लेखी निवेदम सादर करावे. तसेच सर्वांनी बसून घ्यावे.

**उपस्थित नागरिकांनी विचारलेले प्रश्न व त्यास प्रकल्प प्रवर्तक / प्रकल्प सल्लागार / पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणी समिती यांना दिलेली उत्तरे याबाबतची माहिती पुढीलप्रमाणे आहे-**

१) श्री लालबहादुर जाधव, राहणार–मुंबई (आंदोलनकर्ता) -

उपस्थितांना आवाहन करतो की येते आलेले अधिकारी आपल्या प्रश्न सोडविण्यास आलेले असून जर आपण आपसात भांडत बसलो तर त्याचा काहीही उपयोग होणार नाही. तरी आपण जेथे उभे आहात, तेथेच बसण्याची सूचना केली. त्यांच्या आवाहनानंतर बरेच लोक शांत झाले.

त्यावेळी **सदस्य, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती** यांनी उपस्थितांना आवाहन केले की ज्याप्रमाणे श्री लालबहादुर जाधव यांना माईक देण्यात आला, त्याचप्रमाणे तो सर्वांनाच देण्यात येईल. तरी आपण आळीपाळीने येऊन आपले विचार, सूचना या निर्भयपणे मांडाव्यात. त्याच्यात एकाही शब्दाचा बदल होणार नाही. आपणास जेवढा वेळ घ्यायचा आहे, तो तेवढा घ्यावा. आपण उपस्थित केलेल्या सूचना, आक्षेप यांची नोंद घेण्यात येईल.

२) **श्री अरुण चिंचरकर, राहणार-कवडली गाव, तालुका-दापोली, जिल्हा-रत्नागिरीः-**

माझे येथील स्थानिक जनतेतर्फ सर्वांना सांगणे आहे की जनतेने शांतता बाळगावी. आपला या मायनिंग प्रकल्पास विरोध करण्यासाठी आलेलो आहोत. जर आपला विरोध हा १००%आहे, तर ही जनसुनावणी आपल्याला होऊन दयायची नाही. तरी आमची शासनास विनंती आहे की ही जनसुनावणी ताबडतोब रद्द करण्यात यावी व ही जनसुनावणी बैठक ही ताबडतोब थांबविण्यात यावी.

३) **श्री अरुण पाटील, राहणार- तालुका-दापोली,जिल्हा-रत्नागिरी** यांनी मागणी केली की मंचावरील व्यक्तींनी आपली ओळख करुन देण्यात यावी.

बैठकीतील उपस्थितांच्या मागणीनुसार मंचावरील समितीने त्यांची ओळख करुन दिली. श्री संजय जिरापुरे, उप प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, चिपळूण तथा आयोजक,पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती, तर सदस्य, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी स्वतःची ओळख प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, कोल्हापूर अशी करुन दिल्यानंतर सांगितले की पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समितीचे अध्यक्ष श्री चंद्रकांत सूर्यवंशी, अपर जिल्हादंडाधिकारी हे रत्नागिरी वरून आपल्यासाठी आलेले आहेत. तसेच तहसीलदार मॅडम, महसूल विभागाचे सर्व अधिकारी व कर्मचारी वृंद हे आपल्यासाठी आलेले आहेत. आपण कितीही वेळ घ्या, आम्ही सर्व तुमचे म्हणणे ऐकून घेणार असून आम्ही कोणालाही विरोध करणार नाही. आमची विनंती आहे की आपण शांततेने सूचना, आक्षेप नोंदवावेत.

४) **श्री भावेश कारेकर, राहणार–मांदिवली,तालुका-दापोली,जिल्हा-रत्नागिरीः-**

कंपनीच्या पर्यावरण सल्लागार यांनी जो पर्यावरण आघात मुल्यांकन (ईआयए) अहवाल उपलब्ध केलेला आहे, तो २५० पानांचा असून इंग्रजीत उपलब्ध केलेला आहे. एक गट म्हणतो की प्रकल्प उत्पादनात ब्लास्टींग होणारच नाही. सादरीकरण करताना सांगितले की येथे मशिनरी लागणार मात्र सदरहू अहवालात सांगितले की येथे ब्लास्टींग होणारच आहे. अहवालात सर्वेक्षण सांगते methodology and preliminary and secondary data collection study area - तेथे उत्तर दिलेले आहे satellite data. तर येथे कोण येत होते ? Survey of India सगळा जिओवरुन घेतलेला आहे. आम्हांला जर माहिती लागली तर आम्ही ती घेऊच. ब्लास्टींग होणारच आहे हे अहवालात नमूद केलेले आहे.
तसेच अहवालात असे नमूद आहे की ब्लास्टींगमुळे होणारे ध्वनी प्रदूषण. म्हणजे प्रकल्पात ब्लास्टींग हे होणारच आहे, मात्र परिसरातील गावांमध्ये मुद्दामून चुकीची माहिती पसरविण्यात येत आहे की येथे ब्लास्टींग होणारच नाही, तसेच ध्वनी प्रदूषण हे होणारच नाही. आमची मागणी आहे की संपूर्ण पर्यावरण आघात मुल्यांकन (ईआयए) अहवाल स्थानिकांना महाराष्ट्र राज्याच्या अधिकृत भाषेत मराठीतच उपलब्ध करुन देण्यात यावा. संपूर्ण पर्यावरण आघात मुल्यांकन (ईआयए) अहवाल हा मराठीत उपलब्ध केल्यानंतरच पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती ही परत आयोजित करण्यात यावी. त्यास सर्व उपस्थितांनी घोषणा देऊन पाठिंबा दिला.

त्यांनी पुढे सांगितले की मी कोणाच्याही बाजूचा नाही. अहवालात असे नमूद केलेले आहे की however there are some water bodies, nalla, canal within the study area which may be impacted due to mining - म्हणजे अहवाल असे सांगतो की आपल्या परिसरातील पाणी हे प्रकल्पामुळे दुषित होणार आहे.
There will be broken area in the form of access roads, pits, stack temporary and surface water alongwith this area will be get affected. म्हणजे अहवालातच नमूद करण्यात आलेले आहे की पाणी हे दुषित होणार. आम्हाला दुषित पाणी नको आहे.

It may carry time particles alongwith this water will join the seasonal water flowing at low level, the quality of water will be affected. हे आपल्या अहवालात नमूद केलेले आहे.

सदस्य, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी श्री भावेश कारेकर यांना आपण योग्यप्रकारे प्रश्न, मुद्दे उपस्थित करत असून आपण न थांबता विचारावे अशी सूचना केली.

**Direct Impact, Indirect Impact -**

Loss of follow filled and agriculture land - म्हणजे अहवालच असे सांगत आहे की प्रकल्पामुळे शेतजमिनीची हानी होणार आहे.

**Fragmented Habitants -**

**The dust deposition on the vegetation -** म्हणजे परिसरातील वनस्पती, शेतपीकांवर प्रकल्पातील धुळीचा दुष्परिणाम होणार आहे.

**Vegetations damage due to industrial pollutants may have secondary effects on associated funalised insects, birds -** म्हणजे औद्योगिक प्रदूषकामुळे होणारे वनस्पतींचे नुकसान संबंधित फनालाइज्ड कीटकांवर, पक्ष्यांवर दुय्यम परिणाम करू शकतात-

**Gases - Impact on Air Environment**

Gases emissions will be generated from HEMMS & transportation of vehicles on Ambient Air Quality (AAQ) -म्हणजे - एम्बियंट एअर क्वालिटी (AAQ) वर HEMMS आणि वाहनांच्या वाहतुकीतून वायूंचे उत्सर्जन केले जाईल - हे प्रकल्पाच्या सल्लागारानेच ईआयए अहवालात नोंदविलेले आहे.

श्री भावेश कारेकर यांनी पुढे सांगितले की या ईआयए अहवालात वनविभागाचा एक अहवाल लावलेला आहे. पत्र आहे जुलै, २०२३, मात्र त्यास अहवाल लावलेला आहे तो आहे २००९ चा. म्हणजे हा आऊटडेटेड अहवाल लावलेला आहे. जर शासकीय कामांसाठी गटबुक नकाशा हा सहा महिन्यापेक्षा जास्त घेत नाहित, तर येथे चौदा वर्षांपूर्वीचा आऊटडेटेड अहवाल लावलेला आहे. बिलाल हकीम महमद, श्री महमूद हकीम मुकादम यांच्याबरोबर इतर लोक पंचनाम्यासाठी आमच्या वाडीतील लोक मिळाले नाहित काय ?

सादरीकरणात सांगितले की प्रकल्प स्थानावर छोटी-मोठी झाडे आहेत. त्यामध्ये ऐन, किंजळ, कुडकुडी, हरळ, भेळा, जांभूळ, उंबर ही झाडे आहेत, म्हणजे ती छोटी झाडे नसून निसर्गाने पिढ्यानपूर्वी दिलेली आहेत.

तरी हा संपूर्ण पर्यावरण आघात मुल्यांकन (ईआयए) अहवाल हा मराठीत स्थानिकांना उपलब्ध करुन देण्यात यावा. माहितीबरोबर लावलेले अहवाल / रिपोर्ट हे अलिकडचे पाहिजेत.

त्यांनी पुढे सांगितले की अहवालात जो गाव नकाशा लावलेला आहे, जो सादरीकरणात दाखविला, तो आम्हांला कळत नाही. तेवढे तांत्रीक ज्ञान येथे नाही. तरी स्फिट सर्वेनुसार माहिती लागेल. त्यानुसार आमचे घर, वाडी किती लांब आहे हे कळेल.

श्री भावेश कारेकर यांनी सांगितले की २०१७ सालचा जिल्हाधिकारी, रत्नागिरी यांचा अहवाल हा विद्यमान जिल्हाधिकारी, रत्नागिरी, पर्यावरण विभाग, महाराष्ट्र शासन यांना सादर केलेला आहे, त्यातील २-३ ओळी वाचून दाखवत आहे - रोवले आणि उंबरशेत याच्यात काय झालेले आहे -हे पूर्वीच्या जिल्हाधिकारी, रत्नागिरी यांनी मुंबई उच्च न्यायालयात सादर केलेले आहे. २०१७ नंतर याच्यात काहीही फरक झालेला नाही.

श्री भावेश कारेकर यांनी सांगितले की बाजूच्या दोन्ही माईन्समुळे मांदिवली व परिसर हा बाधित झालेला आहे. उंबरशेत अहवाल करताना त्यात मांदिवली गाव विचारात घेतलेले नाही. उंबरशेत येथील माईन्सची पूर्ण वाहतुक ही मांदिवली गावातूनच होते. तर पूर्वीच्या दोन्ही माईन्सचा अहवाल व आताचा प्रस्तावित प्रकल्प असे दोन्ही मुद्दे लक्षात घेऊन प्रस्तावित प्रकल्पाचा ईआयए तयार करण्यात आला पाहिजे. कारण Ashapura Mines found to be chronic defaulter असे पाहणी अहवालात जिल्हाधिकारी, रत्नागिरी यांचा अभिप्राय आहे.

तरी मी संबंधित विभागांना विनंती करतो की अगोदर कार्यरत दोन्ही माईन्सची पाहणी त्वरित करण्यात यावी. त्यांना पारित केलेल्या अटी व शर्तींचे पालन होते का याबाबत तपासणी करण्यात यावी, कारण स्थानिकांच्या माहितीनुसार त्या संबंधित दोन्ही माईन्सने अटी व शर्तींचे उल्लंघन केलेले आहे. त्यासाठी पुरावे सादर करत आहे. त्या दोन्ही माईन्सने पारित केल्यानुसार

हरितपट्टा विकसित केलेला नाही -सॅटेलाईट फोटोनुसार दोन्ही खाणींनी प्रकल्प परिसरात कुठेही हरितपट्टा विकसित केलेला नाही.

त्यांनी दोन्ही कंपनीच्या तपासणी अहवालातील माहिती वाचून दाखविली की the main reason for this road to be in the bad shape in the moment of foray carrying trucks weighing upto 10 Tons.

मात्र ट्रक्स त्यापेक्षा जास्त वजनाची वाहतुक करतात. रस्ते हे पुर्णपणे खराब झालेले असून आम्हांला असे रस्ते नकोत. हा अहवाल २०१७ चा आहे. करोनामुळे जरी आपण दोन वर्षे बंद धरले, तरीही डंपर हे चालूच होते. जर असे होत आहे, तर त्यावर तपासणी व पुढील कारवाई कोण करते? कार्यरत दोन्ही खाणींची तपासणी कोणी करत नाही असाच निष्कर्ष निघतो.

तरी माझी म्हणजे मांदिवली गावाची विनंती आहे की प्रथम रोवलेची पाहणी करण्यात यावी. तेथील पर्यावरणाचा आघात तपासण्यात यावा. ईआयए अहवालात फक्त नद्या दर्शविण्यात आलेल्या आहेत. मात्र जलस्त्रोतांचा उल्लेख नाही. आज बाईतवाडीत परतुर झ-याचे पाणी येते. त्या झ-याचे पाणी संपल्यानंतर एप्रिल-मे मध्ये रोवालेच्या खाणीतील लोक माझ्या विहिरीवर पाणी भरण्यास येतात.

तरी स्थानिकांना संपूर्ण पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल हा संपूर्णपणे मराठीत उपलब्ध करण्यात यावा.

तसेच दुसरी विनंती आहे की सदरहू पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल तयार केलेली कंपनी / पर्यावरण सल्लागार हे गुरुग्रामचे आहेत. तरी महाराष्ट्रातील स्थानिक पर्यावरण सल्लागार यांनी हा अहवाल परत तयार करुन तो मराठीत उपलब्ध करुन देण्यात यावा. त्यास अलिकडील पत्रव्यवहार/संदर्भ नविन पर्यावरण अहवाला तयार करताना विचारात घ्यावेत. वन्य प्राण्यांचा अहवाल हा एका दिवसात तयार करता येत नाही. तरी मागणी केल्यानुसार सर्व ईआयए अहवाल हा मराठीत उपलब्ध करुन देण्यात यावी व नंतरच पुन्हा जनसुनावणी आयोजित करण्यात यावी.

सदस्य, पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी मत मांडले की आता बैठकीत श्री भावेश सरांनी जे विचार मांडले, ते पर्यावरणविषयक जनसुनावणीसाठी अगदी योग्य असून अशाच सूचना, आक्षेप नोंदविण्यासाठी येथे

पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी आयोजित करण्यात आलेली आहे. तरी उपस्थितांनी एकाएकाने प्रस्तावित प्रकल्पाविषयी पर्यावरण विषयक सूचना, आक्षेप उपस्थित करण्यात याव्यात.

५) **<u>श्री चंद्रशेखर वेदपाठक, राहणार–मांदिवली गाव, तालुका-दापोली,जिल्हा-रत्नागिरी</u>**

पर्यावरणविषयक जनसुनावणी समितीचे स्वागत आणि सर्वांना शांततेने राहण्याचे आवाहन करण्यात येत आहे. आताच आमच्या मांदिवली गावातर्फे श्री भावेश कारेकर यांनी जे मुद्दे मांडले आहेत, ते सर्व योग्य आहेत. हा ईआयए अहवाल तयार करताना सर्वेक्षण कुठे व कसे झाले हे स्थानिकांनाच माहित नाही. आता प्रश्न येतो उद्योगधंद्याचा - असे सांगितले जाते की स्थानिकांना रोजगार मिळेल. तर आपण आमच्याबरोबर रोवला उंबरशेत चला, आज त्या गावाची परिस्थिती बघा, त्या गावातील शाळा ही बंद झाली. सर्व उपस्थितांनी त्यास पाठिंबा दिला. जर मायनिंगमुळे रोजगार दिला जातो, तर गावे व गावातील लोक सोडून का गेले ? रोवले व उंबरशेत शाळाच बंद झालेल्या आहेत. जर त्या गावात उद्योगधंदे आहेत, तर तेथील लोक गेले कुठे?मांदिवली गाव व पंचक्रोशीतील माणसे येथे बैठकीत आलेली आहेत. प्रकल्प स्थानापासून १० कि.मी.परिघातील लोक येथे आलेले आहेत. त्यांचाही येथे हक्क आहे. त्यांनाही या प्रकल्पाचा त्रास होणार असल्याने आमचा या प्रकल्पास पूर्णपणे विरोध आहे. येथे बाहेरील, ५० कि.मी. अंतरावरील माणसे आणलेली आहेत. त्यांचे आम्ही ऐकणार नाही. रोवला उंबरजेची लोक का गाव सोडून गेले ? बैठकीनंतर शासकीय अधिका-यांनी आमच्यासोबत यावे, आपण सर्वेक्षण करु - गावातील किती लोकांना रोजगार मिळाला, किती लोकांना उद्योगाचा फायदा झाला, किती लोक गाव,घर सोडून गेले याचा अभ्यास करा. स्थानिकांच्या मागणीचा, विचाराचा आदर करा. शासनाची कुठलीही दडपशाही ही खपवली जाणार नाही. प्रकल्पाविरुध्द यापेक्षा तीव्र आंदोलन उभारले जाईल याची नोंद शासनाने घ्यावी.

६) **<u>श्री मनोज केळकर, राहणार-मांदवली,तालुका-दापोली,जिल्हा-रत्नागिरीः-</u>**

आता जे रोवले व उंबरशेत मायनिंग चालू आहे, ते आमच्या गावातच चालू आहे. मायनिंग जेव्हा सुरु होते तर पहिला प्रश्न सरकारी अधिका-यांना आहे की प्रथम परवानगी घेऊन नंतर जनसुनावणी का घेता?हे जर प्रथम शासनाकडे आलेले

होते, तर स्थानिकांना संभ्रमात, अंधारात का ठेवले?बैठकीत भावेशसरांनी फोटो दाखविले, तेथे १३९ हेक्टरमध्ये जंगल आहे. येथे वनविभागाचे कोणी उपस्थित आहे का? येथे फक्त दगडधोंडे दाखविलेले आहेत. जो सड्या असतो,तोही जंगलाचा एक भाग असतो. तेथेही शेडयुल १ प्रमाणे प्राणी राहतात. त्यांच्या अधिवासाचे काय? आज रोवल्यातील व उंबरशेततील त्यांचा अधिवास हा पूर्णपणे नष्ट झालेला आहे. या मांदिवली येथील प्रकल्पास मान्यता देण्यात येऊ नये व त्याचप्रमाणे चौकशी करुन रोवले व उंबरशेत मायनिंग बंद करण्यात यावी.
येथील रस्त्यावर अनेकवेळा कंपनीच्या वाहनांमुळे अपघात झालेले आहेत. ये़थील रस्ते अत्यंत अरुंद असुन ४० टनांचे डंपर या रस्त्यावरुन कसे जाणार?
प्रस्तावित मायनिंग कंपनीच्या व्यवस्थापनाकडून सर्व गावात बातम्या पसरविल्या जात आहेत की येथे सर्वांना रोजगार मिळेल. ते खोटे आहे. गावातील राजकीयदृट्या मोठे आहेत, त्यांना हाताशी धरुन सर्व गावाचे तोंड बंद केले जाते. रोवले व उंबरशेत पर्यावरण अहवाल हा चिपळूणच्या हॉटेलमध्ये बसून लिहिला गेला, तसाच या प्रस्तावित प्रकल्पाचा पर्यावरण आघात मुल्यांकन (ईआय़ए) अहवाल लिहिला गेला असून तो आम्हांला मान्य नाही. येथे ८-१० दिवस कोणीही येत नाही. आता खोटे आश्वासने देण्यास याल. नंतर जनतेला फक्त आणि फक्त हाल अपेष्टा भोगाव्या लागतात. कोणीही मदतीला येत नाही. शासकीय कार्यालयात दाद मागण्यास गेल्यानंतर अर्ज द्या, तो वरिष्ठांकडे पाठवतो असे उत्तर देण्यात येते. आता सगळे शासकीय अधिकारी व प्रकल्प अधिकारी मान डोलवून आश्वासन देतात, नंतर कोणीही आमच्या पाठीशी येत नाही. तरी १३९ हेक्टर हे जंगल आहे. ते जंगलच राहू द्या. ते कमीतकमी प्राणवायू तरी देत आहे. माझा मुद्दा आहे की येथे बॉक्झाईटसाठी म्हणजे अल्युमिनियमसाठी खनन करण्यात येणार आहे. तर आपल्याला अल्युमिनियमची गरजच नाही. रस्त्यावर फिरताना बघाल, तर कोटयावधी टन अल्युमिनियमचे डबे, सरबताचे कॅन, साहित्य पडलेले असते. तर पर्यावरणाची हानी करून अल्युमिनियम खाणीतून काढायचे कशाला? आणि १३९ हेक्टर जंगल आहे, ते आपल्याला प्राणवायू देत आहे. कुठलीही खाण ही प्राणवायू देत नाही. त्यामुळे या खाणीला परवानगी न देता बंद ठेवाआणि जनतेची भावना लक्षात घेऊन बंद आणि बंदच ठेवा.

७) **<u>श्री तानाजी रामचंद्र शिगवण, राहणार-मांदिवली-सावंतवाडी, तालुका--दापोली, जिल्हा-रत्नागिरीः-</u>**

विनंती अर्ज देण्यात येत आहे की आम्ही मांदिवली-सावंतवाडी ग्रामविकास मंडळ, मुंबई, आमच्या गावात येणा-या माईनिंग प्रकल्पाला आमचा विरोध आहे. अशा प्रकल्पामुळे आमच्या गावातील नैसर्गिक जलस्त्रोतावर परिणाम होत आहे. त्यामुळे जमिनीची पाण्याची पातळी खाली जात आहे. तसेच हवेत उडणा-या मातीच्या कणांमुळे फळलागवडीवर परिणाम होत आहे. आजूबाजूच्या परिसरात रोवला आणि उंबर**शेत** येथील मायनिंग प्रकल्पामुळे आधीच हा त्रास आम्ही भोगत आहोत. माती भरून येणा-या गाड्यांच्यामुळे मातीचे कण उडत असतात, त्यामुळे आमच्या स्वास्थ्यावर परिणाम होत आहे. बरेचवेळा भरलेल्या गाड्यांचा ताफा सुटून अपघातदेखील होतात, त्यामुळे आमच्या जीवाला धोका आहे. आमच्या वाड्या डोंगरपायथ्याशी वसलेल्या आहेत. खनिज उत्पन्न चालू झाले की या सर्व वाड्यांना धोका निर्माण होऊ शकतो. उदा - इर्शाळवाडीत जी परिस्थिती घडली ती परिस्थिती भविष्यात मांदिवली आणि आजूबाजूच्या गावात घडू शकते. आधीच आमची गावे ही निसर्ग व तोक्ते वादळामुळे होरपळून निघालेली आहेत आणि पर्यावरणाचा -हास होणारा हा प्रकल्प आमच्या माथी मारला जातो, या प्रकल्पास आमचा विरोध आहे. तरी आमच्या या अर्जाचा काळजीपूर्वक विचार व्हावा ही विनंती.

८) **<u>-इरशातवाडीची व्यक्ती -</u>**

आमचे गावही डोंगराच्या पायथ्याशी आहे. या दुर्घटना कशा घडल्या, तर विविध क्षेत्रातील तज्ज्ञ लोकांना विचारल्यानंतर त्यावेळी त्यांनी योग्य उत्तर दिले की गाडगीळ कमिशनचा जो अहवाल होता, त्यावर बोट ठेवले व जर का सरकारने गाडगीळ अहवाल स्विकारला असता, तर ही वेळ आज आली नसती. ठीक आहे- सरकारचा नियम आहे की मेलेल्यांना पाच लाख आणि जखमी झालेल्यांना पन्नास हजार. तर आमचे पाच लाख जमा करुन ठेवलेले आहेत काय? जे उरतील त्यांना पन्नास हजार द्या. विचार करा, या गाड्यांमधून जी वाहतुक होते, ती इतकी भयंकर होते, लोकांना सांगायला आणि ते बिनधास्तपणे गाड्या चालवतात. तरी आपणस नम्र विनंती करतो की आम्हांला न्याय देण्यात यावा.

९) **<u>श्री अशोक बाईत, सचिव, संघर्ष समिती, मुंबईः-</u>**

या अगोदर मांदिवली-सावंतवाडी लोकांनी जिल्हाधिकारी, रत्नागिरी यांना पत्र लिहिलेले आहे, त्याचप्रमाणे आम्हीसुध्दा जिल्हाधिकारी,रत्नागिरी आणि उप प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ यांना पत्र सादर केलेले आहे की -मांदिवली येथे होणा-या बॉक्साईट मायनिंगला लोकांचा विरोध. मांदिवली येथे हनिफा हरुण फजलानी यांच्याकडून बॉक्साईट उत्खनन केले जाणार आहे. त्याचप्रमाणे २०० टन प्रति ताशी उत्खनन होणार आहे. जर हा प्रकल्प झाला तर त्याचे दुःष्परिणाम खालीलप्रमाणे होणार आहेत -

सध्या मांदिवली गावाला पिण्याचे पाणी शौर्य नदीतून मिळते. हा प्रकल्प झाला तर त्याचा परिणाम पिण्याच्या पाण्यावर होणार आहे. कारण मायनिंगची डंपर वाहतुक त्याच भागातून होणार आहे, त्यामुळे पाण्याचे पाईप्स आरामात तुटण्याची शक्यता आहे.

बाईतवाडी भागात ज्या भागात मायनिंग पट्टा दर्शविलेला आहे, त्या भागात बाईतवाडीला पिण्याचे पाणी मिळते. जर मायनिंग झाले, तर पाण्याचे स्त्रोत नष्ट होण्याची शक्यता आहे.

मायनिंगमुळे आंबा, काजू, कोकम, करवंदे व इतर फळझाडे ही नामशेष होतील अशी भिती आहे. मायनिंगमुळे वन्यप्राण्याच्या राहण्याच्या जागा नष्ट होतील, त्यामुळे ते लोकवस्तीत येण्याची शक्यता आहे. त्यांचे वंशज दुर्मिळ होतील. मायनिंगच्या सततच्या वाहतुकीमुळे आणि धुळीचा त्रास होऊन दमा, श्वसनाचे आजार होण्याची शक्यता आहे. मायनींगच्या वृक्षतोडीमुळे पर्यावरणावर परिणाम होऊन पाऊस कमी पडेल,त्याचा परिणाम पीकांवर होईल असे आम्हांला वाटते. मायनींगच्या खोदकामामुळे पाण्याचे जीवंत झरे नष्ट होतील असे आम्हांला वाटते. मायनींगच्या सततच्या वाहतुकीमुळे परिसरातील वाड्या,वस्त्यांना धुळीचा त्रास होतो व शाळेच्या लहान मुलांच्या जीवीताला धोका आहे. मायनींगच्या डंपरची वाहुतक क्षमतेपेक्षा जास्त माल भरल्याने पुलाची वाहतुक क्षमता तेवढी नाही, म्हणून तो पूल कोसळण्याची शक्यता आहे. तरी बॉक्साईट मायनींग होऊ नये, म्हणून पंचक्रोशीतील लोकांचा मायनींगला विरोध आहे. हा विरोध कायम राहिल. तरी आमच्या

अर्जाचा पुरेपुर विचार करुन मायनिंग बॉक्साईट रद्द करावी ही विनंती, असा अर्ज केलेला आहे.

बैठकीत जो पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल वाचण्यात आला, तर त्या अहवालात जे शिक्षित आहेत, त्यांना रोजगार देण्यात येईल असे सांगितले. तर स्थानिकांना रोजगाराची संधि देताना उपहारगृह चालविणे, स्वच्छतागृह चालविणे, साफसफाई करणे ही स्थानिकांना कामे दिली जाणार आहेत. जर स्थानिकांचा अपमान होत असेल, तर एवढीच कामे स्थानिकांनी करावीत काय? हा ईआयए अहवाल मायनींग प्रकल्पाचे समर्थन करणारा आहे, मायनींगला पाठिंबा देणारा आहे. तरी तो अहवाल आम्ही फेटाळून लावतो व आमचा मायनिंगला ठाम विरोध आहे आणि तो राहिल.

१०) <u>कविता चांदोरकर, राहणार-रोवले,तालुका-दापोली,जिल्हा-रत्नागिरीः-</u>

रोवलेला माझे घर आहे, माझी गोशाळा आहे. या मायनिंगचा सर्वात मोठा प्रश्न काय आहे, तो मी जवळून बघितलेला आहे. छोट्या छोट्या गोष्टीतून माझे शब्द आपणास घाणेरडे वाटतील. ज्यावेळेस् मायनिंग चालू होते, एखादया व्यक्तीला बांधले व तोंडात घास घातला, तर त्यास आपण म्हणतो बळजबरी किंवा बलात्कार. तो आपण जमिनीवर करता, ज्या जमिनीतून आपली सीतामाऊली आली. त्यावर अनेक पक्षांची अंडी असतात, गवे, रानडुक्कर यांना आपण हुसकावून लावतात, ते कशासाठी, तर काही तरी बॉक्साईट काढण्यासाठी. त्याचा वापर आपण चांगल्यासाठी करु शकतो - तेथे आमराई करु शकतो, तेथे काजूलागवड करु शकतो, तेथे गायरान होऊ शकते. तळे हे बरेच वैविध्यपूर्ण गोष्ट आहे. दुसरी गोष्ट जेव्हा हे मायनिंगचचे डंपर येतात, माझ्या घरासमोर अनेकवेळा तक्रार केलेली आहे, अर्धनग्न अवस्थेत माणसे फिरतात. बाईला नजर उचलून बघायला लाज वाटते, चारवेळा माझ्या नव-याने त्यांना रागावले, पण काहीही उपयोग झालेला नाही. त्याचप्रमाणे हे सर्व परप्रांतीय असतात, ते रस्त्यावरच प्रातर्विधी करतात. नाकाला रुमाल लाऊनच फिरावे लागते. तरी माझी पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समितीस, शासनास विनंती आहे की आपण आता रोवले, उंबरशेला त्वरित फेरी मारावी.

रोवलेची जी विजयवाडी आहे, तेथे जोरात पाऊस झाल्यास अख्खीच्या अख्खी विजयवाडी ही मातीच्या ढिगा-याखाली जाणार आहे. ते कळणारच

नाही की तेथे विजयवाडी होती. दुसरी गोष्ट की आता मोठा पाऊस झाला, तेथे केळशीत पाणी साचले. कारण आमचे डोंगरच गेलेले आहेत. त्यामुळे पाणी मुरत नाही, ते केळशीत येते. निसर्ग वादळ झाल्यानंतर सर्वांना अहवाल दिला की समुद्र गरम होत आहे. समुद्र गरम का झाला, आम्ही डोंगर फोडतो, झाडे तोडतो, समुद्रात कॉक्रीटचे पेवर ब्लॉक टाकतो, जेटी करत आहे. अशा वादळाला आपण सामोरे सारखे सारखे जायचे का? मी मुंबईहून माझा योग व्यवसाय सोडून येथे नैसर्गिक शेती करण्यास आले की लोकांना एक उदाहरण देता येईल. आता येथे माझे खच्चीकरण करण्यात आलेले आहे. येथे आमचा आवाज ही पूर्णपणे दाबण्यात येत आहे. दुसरी गोष्ट हे पाण्याचे, टँकर्स, डंपर्स येतात, त्यांची भाषा अत्यंत मुजोरीची असते. दोन वेळा माझा त्यांच्यामुळे अपघात झालेला आहे, माझी स्कुटर ही ठोकलेली आहे. तरी असे होऊ देऊ नका. आम्ही कोकण छान फुलवू. जर आपण तसे करणार नसाल,तर आम्ही करुन दाखवू, मात्र मायनिंगने कोकण खराब करु नका.

११) <u>**श्री रुपेश बंगाली, राहणार-मांदिवली गाव, तालुका-दापोली, जिल्हा-रत्नागिरीः-**</u>

मी कोकणचा रहिवाशी आहे. आता जो प्रकल्प सुरु करायचा आहे,त्यात आमची जमिन आहे. जमिन घ्यायला बरेच लोक आलेले होते. तुला एवढी काय करायची आहे. मी सुध्दा मोलमजुरी करुन खातो. आमच्या जमिनीचे सर्वेक्षण झाले, खांब पुरले गेले, त्याचा कोणालाच पत्ता नाही. मी जेव्हा स्थानिकांना विचारले,तेव्हा आम्हांला काहीही माहिती नाही असे सांगतात, उडवाउडवीच्या गोष्टी सांगतात. आमच्या अनंतवाडीवरुनच उंबरशेतच्या मायनिंगची वाहतुक चालू असते. प्रथम सहा टायर्सचे डंपर चालू होते, नंतर त्यांनी पंधरा टायर्सचे डंपर चालू केले. स्थानिकांनी तक्रार, आक्षेप नोंदविल्यानंतर दहा टायर्सचे डंपर सुरु केले. त्यांना किती माल नेता असे विचारले असता त्यांनी ४०-४५ टन माल जातो असे सांगितले. मात्र ईआयए अहवालात लिहिले आहे की दहा टनापेक्षा जास्त माल जाणारच नाही. तरी मायनिंग न येण्यासाठी संघर्ष करा. माझी मायनिंगसमोर झोपायची तयारी आहे.

१२) <u>**श्री अजित अनंत वेलणकर, राहणार- मांदिवली, तालुका -दापोली, जिल्हा- रत्नागिरीः-**</u>

या मायनिंगमुळे स्थानिकांना श्वसनाचे, दम्याचे आजार वाढलेले आहेत. जर डंपरखाली कोंबडी गेली, तर कारखानावाले पाच सहा हजार देऊन बाधित लोकांचे तोंड बंद करतात. माझा या मायनिंग प्रकल्पास विरोध आहे.

१३) <u>**श्री असिफभाई मुकादम, राहणार- मांदिवली, तालुका- दापोली, जिल्हा- रत्नागिरी**</u>

सर्वांना नमस्कार. येथे हा प्रकल्प चालू करायचा का नाही करायचा हा विषय १००%आहे. पण त्या अगोदर आपण गावातील सर्व लोक आहोत, आपण एक राहिले पाहिजे. आपल्यात आपापसात भांडण न होता जो विषय आहे, तो सोडवू शकतो. ज्यांना प्रकल्प हवा आहे, ते १००% प्रयत्न करणार, तर ज्यांना नको आहे तेसुध्दा त्यासाठी १००% प्रयत्न करणार आहेत. यात महत्वाचे म्हणजे आपले गावातील लोकांचे संबंध हे वाईट झाले नाही पाहिजे. आम्ही चालू करणारे असेल,तर न करणा-यांनी आम्हांला वैरी समजू नये, तसेच ज्यांना नको तेही आपले वैरी नाहीत.

त्यांनी सांगितले की बैठकीत श्री भावेश कारेकर यांनी जे विचार, मुद्दे प्रकल्पाविषयी उपस्थित केले, ते चुकीचे नाहीत, कारण गावावर काही संकट येऊ नये म्हणून त्याने काही सूचना केल्या असतील.

त्यावेळी उपस्थितांनी प्रकल्पास समर्थन आहे की नाही एवढेच बोला अशी सामुहिक मागणी केली व त्यास पुढे बोलू दिले नाही.

**यावेळी, सदस्य, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी उपस्थितांना आवाहन केले की कोणालाही बोलताना अडथळा आणू नये. प्रत्येकाला आपले विचार, मते, सूचना किंवा आक्षेप उपस्थित करुन द्यावे. त्यात अडथळा आणू नये.उपस्थितांनी आपले प्रस्तावित प्रकल्पाविषयी पर्यावरणविषयक सूचना, आक्षेप असल्यास त्या उपस्थित करण्यात याव्यात.**

**१४) गीतांजली वेदपाठक --**

बैठकीत जमलेल्या सर्व उपस्थितांना विनंती आहे की जे काही म्हणणे आहे, ते शांतपणे मांडण्यात यावे, आरडाओरड करुन काहीही मिळणार नाही. कंपनीच्या बाजूने बोलणा-यांनाही बोलून द्यावे.

त्यावेळी उपस्थितांनी प्रकल्प विरोधी घोषणा देण्यास सुरुवात केली. काही व्यक्ती समुहाने आक्षेप नोंदवत होते की बैठकीस कंपनीने बाहेरची माणसे आणलेली असून त्यांना येथल्या अडचणींची जाणीव नाही, त्यांना बैठकीच्या बाहेर काढण्यात यावे.

त्यावेळी अध्यक्ष व सदस्य, पर्यावरण विषयक जाहीर जनसुनावणी समिती हे उभे राहून सर्व उपस्थितांना शांततेने राहण्याचे आवाहन करत होते.

अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी उपस्थितांना शांततेचे आवाहन करताना सांगितले की आतापर्यंत काही उपस्थितांनी प्रस्तावित प्रकल्पाविषयी तोंडी आक्षेप नोंदविलेले आहेत. त्याचप्रमाणे लेखी निवेदनेसुध्दा बैठकीत प्राप्त झालेली आहेत. बैठकीच्या सुरवातीस आयोजकांनी सांगितल्याप्रमाणे ही समिती प्रकल्पास मंजूरी देत नाही, प्रकल्प नाकारत नाही, तसेच प्रकल्पाची शिफारसही करत नाही. ही समिती आपले प्रस्तावित प्रकल्पा विषयीचे पर्यावरण विषयक विचार, सूचना वा आक्षेप नोंदविण्यासाठी गठीत करण्यात आलेली असून त्याचा अंतर्भाव बैठकीच्या इतिवृतात करण्यात येईल. ते इतिवृत्त महाराष्ट्र शासनाच्या पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्रालयास सादर करण्यात येईल. तेथील तज्ञ समिती प्रकल्पाबाबत योग्य तो निर्णय घेते. स्थानिक जनता व प्रकल्प प्रवर्तक यांचे मध्यस्थ म्हणून आम्ही काम करत आहोत. तरी उपस्थितांनी शांततेने आपल्या सूचना, आक्षेप उपस्थित करावेत. बैठकीत जर शंभरजण आहेत, तर सर्वांनी सामुहिक लेखी द्या किंवा प्रत्येकाने तोंडी सूचना, आक्षेप नोंदवा. ती प्रत्येक बाब दफ्तरी घेतली जाईल. गावातील वैयक्तिक वाद, भांडणे, एकमेकांना विरोध करण्यापेक्षा प्रत्येकाने प्रस्तावित

प्रकल्पाच्या पर्यावरण विषयक सूचना सांगाव्यात. त्याची नोंद घेऊन बैठकीचे इतिवृत्त शासनास सादर करण्यात येईल.

अध्यक्ष यांनी सांगितले की बैठकीत वारंवार एक आक्षेप उपस्थित करण्यात येत आहे की बाहेरची माणसे आलेली आहेत, त्यांना बाहेर काढा. आतापर्यंत बैठकीत पाच निवेदने लेखी स्वरुपात प्राप्त झालेली असून आणखी जितक्या लोकांना लेखी निवेदन सादर करावयाची असतील, त्यांनी ती द्यावी. त्याचप्रमाणे ज्यांना तोंडी सूचना करावयच्या असतील, त्या कराव्यात. कोणी कंपनीच्या बाजूने बोलेले किंवा कंपनीच्या विरुध्द संघर्ष समितीच्या बाजूने बोलेल. एकमेकाला बोलताना अडवू नका. जे आपण बोलणार आहात, ते सुचिबध्द करण्यात येणार आहे.

१५) **<u>श्री असिफभाई मुकादम, राहणार-मांदिवली, तालुका-दापोली,जिल्हा-रत्नागिरीः-</u>**

मी गेले बरेच वर्ष मायनिंग क्षेत्रात काम करत आहे. तुमचा विरोध आहे, त्यास मी नकार देत नाही, कारण आपणास मायनिंगविषयी खूप माहिती आहे, तसेच खूप माहिती नाही उदा-ब्लास्टींगचा विषय. बैठकीत रोवला व उबरशे येथील मायनिंगसंदर्भात चर्चा करताना ब्लास्टींगची विषय निघाला. तर त्यास उत्तर देतो की गेल्या ४-५ वर्षापूर्वी -कदाचित सात वर्षापूर्वी, सरकारने रोवला व उबंरशेत येथील मायनिंगला ब्लास्टींगची परवानगी देण्यात आलेली होती. तेथे आता ब्लास्टींग होत नाही, तर सर्व माल हा ब्रेकींगने काढला जातो.

दुसरा विषय - ४३ व ४४ नंबर स्लाईड.

त्यांनी पुढे सांगितले की आमचा कोणालाही विरोध नाही, संघर्ष समितीच्या मागण्यांना विरोध नाही. आपण समन्वयाची भूमिका घेऊन मार्ग काढणे आवश्यक आहे. एकत्र बसून चर्चा करुन त्याबाबत दिशा ठरविता येईल.

१६) **<u>श्री शैलेश कारेकर, राहणार-मांदिवली, तालुका–दापोली,जिल्हा-रत्नागिरीः-</u>**

मांदिवलीवासीयांचा दडपलेला संघर्ष येथे दिसत आहे. मानवी सैतानाचा डोळा निसर्गरम्य मांदिवली नावाच्या गावावर पडलेला आहे. येथेच सुरु झाला मांदिवली निसर्गाचा -हास. बघता बघता या मानवी सैतानाने एक मांदिवली डोंगर कसा ढापला, मूठभर पैशासाठी विकलेले काही लोक, त्यांच्यामुळे काही लोक आता हा त्रास भोगत आहेत. संघर्ष येथेच संपणार नाही. मादिंवली डोंगर

बघता बघता नाहिसा होईल, एक मांदिवली गाव नकाशावर दिसेल. म्हणून आमचा माईन्सला विरोध आहे.

एकच सांगतो, येथे रॉयल्टी येणार असे सांगतात. तर जेथे माईन्स आहेत, त्या गावात किती रॉयल्टी खर्च केली. किती पैसा त्या रॉयल्टीचा त्या गावाला मिळाला? माझा माईन्सला विरोध आहे.

१७) <u>राधाकृष्ण जाधव, राहणार-मांदिवली,तालुका-दापोली,जिल्हा-रत्नागिरीः-</u>

सरळ प्रश्न विचारतो, विषयाला हात घालतो. आम्ही असे ऐकलेले आहे की सर्व पूर्तता झालेली आहे. मायनिंगच्या कंत्राटदाराला परवानगी देण्यात आलेली आहे. बैठकीत मायनिंग हवी आहे असे म्हणणा-यांना त्यांनी पैसे वाटलेले आहेत. माझीसुध्दा मायनिंग मध्ये जमिन गेलेली आहे. मी वैयक्तिक लढू शकतो. येथील ९०% लोक मायनिंगच्या विरोधात आहेत. आपण शांत बसा असे म्हणता, तर मायनिंगचा विरोध कसा आपल्याला समजणार? आम्ही लढा ऊभा केलेला आहे, शेवटपर्यंत लढणार. कंपनीचे एजंट घराघरात फिरत आहे. स्थानिकांवर दबाव आणत आहेत.

१८) **<u>श्री आदेश केणे, माजी सभापती,मंडणगड,विधानसभा क्षेत्र प्रमुख, दापोली-खेड,शिवसेनाः-</u>**

विषय प्रथम समजून घ्या. मायनिंगला समर्थन, कोणाचा विरोध राहणारच. आमच्या दोन तालुक्यात - खेड, दापोली किंवा मंडणगड असेल,या तीन तालुक्यात रोजगार नाही. त्यामुळे आमच्या तीन तालुक्याची लोकसंख्या ही वर्षाला दोन-दोन हजारांनी घटत आहे. माझ्या तालुक्याची लोकसंख्या १९८० मध्ये ७०-७५ हजार होती, ती आज ५५,००० वर आलेली आहे. रोजगार आला पाहिजे, रोजगार असलाच पाहिजे, नविन कंपनी आलीच पाहिजे. त्यावेळी उपस्थितांनी समुहासमुहाने "मायनिंग हटवा" म्हणून घोषणा दिली. एकच गोंधळ उडालेला होता. खूप लोक मायनिंग "नाही नाही" म्हणून हात हलवत होते. त्यावेळी श्री. केणी ऐकून घ्यायला शिका असे ओरडत होते. त्यावेळी सदस्य, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती हे उभे राहून सर्व उपस्थितांना शांततेने बसण्याची सूचना करत होते. तरीही उपस्थित बराच गोंधळ करत होते.

अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समितीने तीन वेळा उपस्थितांना वारंवार प्रस्तावित प्रकल्पाच्या पर्यावरणविषयक विचार, हरकती, सूचना, आक्षेप नोंदविण्याचे आवाहन करण्यात आलेले होते. जनसुनावणीत गावातील वाद, भांडणे यावरुन एकमेकाला न बोलू देणे असे न वागण्याची वारंवार सूचना करण्यात आली.

बैठकीत लेखी निवदनेसुध्दा प्राप्त झालेली आहेत. त्याचप्रमाणे १७ लोकांनी प्रस्तावित प्रकल्पाविषयी सूचना, आक्षेप नोंदविलेले आहेत. उपस्थित वारंवार आपापसातील मतभेदावर वाद घालत आहेत. तो या जनसुनावणीची उद्देश नाही. मात्र वैयक्तीक हेवेदावे हे जनसुनावणीत काढण्याचा प्रयत्न उपस्थित करत आहेत. तरी ही जनसुनावणी आता येथे थांबविण्यात येत आहे.

१९) **<u>श्री राजेश गुजर, दापोली तालुका पंचायत समिती,माजी सभापती, माजी उपसभापतीः-</u>**

माझा गाव मुंगीस आहे, पण जनतेच्या काय भावना आहेत त्या समजण्यासाठी मी जनसुनावणीस उपस्थित राहिलेलो आहे. आपण प्रस्तावित प्रकल्पाविषयीची भूमिका पर्यावरणविषयक जनसुनावणी समितीस सांगण्यासाठी आलेलो असून आपले विचार ते शासनास सादर करणार आहेत. बैठकीत भावेश सरांनी व इतरांनी जे मुद्दे मांडले, त्यात मागणी करण्यात आली ही ईआयए अहवाल हा इग्रजीत करण्यात आलेला आहे. तो सामान्य जनतेस समजत नाही. तो संपूर्ण ईआयए अहवाल हा मराठीत उपलब्ध करुन देण्यात यावा.

तरी आजची जनसुनावणी ही रद्द न करता ती पुढे ढकलण्यात यावी. त्यावेळी उपस्थितांनी एकदम गोंधळ करण्यास सुरवात केली. त्यावेळी बरेच उपस्थित हे मायनिंग हटावच्या घोषणा करत होते.

सदस्य, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की बैठकीत १८ लोकांनी आपल्या सूचना, आक्षेप नोंदविलेले असून बैठकीत 10 लेखी निवदने प्राप्त झालेली आहेत.

मा. अध्यक्षांनी जनसुनावणी ही संपन्न झाल्याचे घोषित केले.

सोबत 10 प्राप्त लेखी सूचना सोबत जोडलेल्या आहेत.

पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी संपल्यानंतर पोलिस प्रशासनातील अधिका-याने स्टेजवर येऊन उपस्थित जनतेस आवाहन केले की अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी जनसुनावणी संपल्याची घोषणा केलेली आहे. तरी सर्व नागरिकांनी आपल्या घरी जावे, कायदा व सुव्यवस्थेचे पालन करावे.

| | |
|---|---|
| **(संजय जिरापूरे)** | **(जगन्नाथ साळुंखे)** |
| आयोजक, | सदस्य, |
| पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती | पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती |
| तथा | तथा |
| उप प्रादेशिक अधिकारी, | प्रादेशिक अधिकारी, |
| महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, | महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, |
| चिपळूण. | कोल्हापूर |

**(चंद्रकांत सूर्यवंशी)**

अध्यक्ष

पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती

तथा

अपर जिल्हादंडाधिकारी,रत्नागिरी

जिल्हा-रत्नागिरी